एसबीआय कार्डच्या सर्वात महत्वाच्या अटी आणि नियम

1. फीज आणि शुल्क

A. जॉईनिंग फीज, वार्षिक फीज आणि नूतनीकरण फीज

एसबीआय क्रेडीट कार्डसाठी (एसबीआय कार्ड) जॉईनिंग फीज, वार्षिक फीज आणि नूतनीकरण फीज लागू आहेत. एका कार्डधारकापासून ते इतर कार्डधारकांपर्यंत आणि एका योजनेपासून इतर योजनेपर्यंत त्या निरनिराळ्या असू शकतात. क्रेडीट कार्डसाठी आवेदनपत्र भरतेवेळी कार्डधारकास सांगितल्यानुसार या असतील. लागू असलेल्या जॉईनिंग फीज आणि वार्षिक फीज, थेट कार्डधारकाच्या खात्यातून वसूल केल्या जातील आणि ज्या महिन्यातून त्या वसूल केल्या जातील त्या महिन्याच्या कार्ड स्टेटमेंटमधे त्यांचा उल्लेखही केला जाईल. प्रायमरी कार्डधारकाने घेतलेल्या अतिरिक्त कार्डासाठी निराळी फीज वसूल केली जाईल.

B. कॅश ऍड्व्हान्स फीज

तातडीच्या प्रसंगी कार्डधारक भारतातील एटीएम/कॅशपॉईंट्स आणि परदेशातील एटीएम्समधून रोख पैसे काढण्यासाठी कार्डचा वापर वापर करु शकतो. या सर्व व्यवहारांसाठी ट्रॅन्झॅक्शन फीज लागू असेल आणि पुढील स्टेटमेंटमधे ती कार्डधारकाकडून वसूल केली जाईल. रु. २.५% किंवा रु. ३०० यातील जी रक्कम देशातील एसबीआय एटीएम/कॅशपॉईंट्स येथे अधिक असेल आणि रु.३०० किंवा २.५% यातील जी रक्कम देशातील इतर एटीएम्समधे अधिक असेल, आणि ३% किंवा रु. ३०० यातील जी रक्कम आंतरराष्ट्रीय एटीएम्समधे अधिक असेल त्या प्रकारे ट्रॅन्झॅक्शन फीज लागू असेल. SBI Cards & Payment Services Private Limited (SBICPSL) च्या धोरणातील बदलानुसार ट्रॅन्झॅक्शन फीज लागू असेल. विथड्रॉवल तारखेपासून ते सेटलमेंट तारखेपर्यंत सर्व कॅश ऍड्व्हान्सेससाठीसुद्धा सेवा शुल्क लागू असेल. सध्या सेवा शुल्क प्रतिमहिना ३.३५% [४०.२% प्रति वर्ष] पर्यंत आणि SBICPSL च्या धोरणातील बदलानुसार ट्रॅन्झॅक्शन फीज लागू असेल.

C. ओटीसी फिज

एसबीआयच्या निवडक शाखा, एसबीआय असोसिएट्स बॅन्क शाखांमधे जाऊन तेथील पे-ईन स्लिपमधे कार्ड क्रमांक आणि रक्कम भरुन कार्डधारक एसबीआय कार्ड ड्यूज काऊंटरवर भरु शकतो. अश्याप्रकारे बिल भरल्यानंतर कार्डधारकाला तातडीने पोहोच पावती दिली जाईल. ही सेवा रु.१०० + सर्व लागू कर या दराने उपलब्ध आहे .

D. शुल्क

1. SBICPSL पुरवित असलेल्या विशिष्ट सेवा किंवा कार्डधारकाचे डिफॉल्ट्स किंवा त्याच्या कार्ड खात्याशी संबंधित इतर बाबी यासाठी असलेले व वेळोवेळी लागू असलेले खर्च दाम आणि फीज, कार्डधारकाने भरायचे आहेत.

2. कोणतेही खर्च दाम किंवा फीज यात वेळोवेळी योग्य बदल करण्याचे किंवा कोणतेही नवीन खर्च दाम किंवा फीज योग्यरित्या लागू करण्याचे सर्व हक्क SBICPSL स्वतःकडे राखून ठेवत आहे. कार्डधारकास यासंबंधित योग्य ती पूर्वसुचना दिली जाईल.

E. इंटरेस्ट फ्री ग्रेस पिरियड

व्यापा-याने सादर केलेल्या क्लेमनुसार इंटरेस्ट फ्री क्रेडीट पिरियड २० ते ५० दिवसांचा असू शकतो. मात्र, मागिल महिन्यातील शिल्लक जर पूर्णपणे क्लियर न केल्यास किंवा कार्डधारकाने कोणत्याही

एटीएम / कॅशपॉईंटमधून रोख पैसे काढल्यास हे लागू होणार नाही.

F. फायनॅन्स शुल्क (सेवा शुल्क)

जर कार्डधारकाने त्याची सर्व शिल्लक पूर्णपणे न भरण्याचे स्विकारल्यास आणि त्याने घेतलेले सर्व कॅश ऍडव्हान्सेस जोवर परत भरले जाणार नाहीत यावर व्यवहार केल्या तारखेपासून सर्व व्यवहारांसाठी मासिक टक्केवारी दरानुसार फायनॅन्स शुल्क असेल. कार्ड इंटरेस्ट दर अनिवार्य असेल आणि कार्डधारकाचा वापर व पेमेंट पॅटर्न यावर अवलंबून असेल आणि ठराविक कालावधीनंतर घेतला जात असलेला आढावा नुसार लागू असेल. व्यवहाराच्या तारखेपासून फायनॅन्स शुल्काचा दर कमाल 3.35% प्रति महिना [४०.२% प्रति वर्ष] पर्यंत वाढू शकतो. फायनॅन्स शुल्काचा दर, लागू असल्यास, सेवा करनुसार असेल आणि कार्डावरील आऊटस्टॅन्डींग पूर्णपणे जमा केली जात नाही तोपर्यंत कार्डधारकाच्या खात्यातून वसूल केला जाईल.

एसबीआय कार्डस ऍन्ड पेमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. (SBICPSL)

a. कॅश ऍडव्हान्सवरील फायनॅन्स शुल्क व्यवहाराच्या तारखेपासून ते पूर्ण रक्कम भरेपर्यंत लागू असेल.

उदाहरण 1 - कार्ड स्टेटमेंट तारीख – प्रत्येक महिन्याची १५ तारीख.

१६ जून '१५ - १५ जुलै '१५ यादरम्यान झालेला व्यवहार

1. रु. ५००० ची किरकोळ खरेदी – २० जून '१५ रोजी
2. रु. ७००० ची रोख विथड्रॉवल – १० जुलै '१५ रोजी

मागील कोणतीही शिल्लक १५ जून २०१५ च्या स्टेटमेंटमधून कॅरीड् फॉरवर्ड असल्याचे गृहीत न धरता, कार्डधारकास रु. ७००० च्या रोख विथड्रॉवलवरील दरानुसार त्याच्या १५ जुलै च्या स्टेटमेंटमधे व्यवहाराचे रु.१२,००० आणि ५ दिवसांचे फायनॅन्स शुल्क दिसेल. ५ ऑगस्ट २०१५ अखेर असलेल्या आऊट्स्टॅन्डींगनुसार कार्डधारकास पेमेंट करावे लागेल, म्हणजेच स्टेटमेंट तारखेपासून २० दिवसातील संपूर्ण रक्कम किंवा किमान ड्यू अमाऊंट या दरम्यानची कोणतीही रक्कम. कृपया नोंद घ्या की आपल्या क्रेडीट कार्ड आऊट्स्टॅन्डींगसाठी केलेले कोणतेही पेमेंट्, आपल्या इएमआय शिल्लकसाठी (असल्यास) वापरले जाईल, त्यानंतर ट्रान्स्फर बॅलन्स (असल्यास), रिटेल बॅलन्स (असल्यास) यासाठी वापरले जाऊन शेवटी आपल्या कॅश बॅलन्ससाठी (असल्यास) ऍडजस्ट केले जाईल. आऊटस्टॅन्डींग रिटेल बॅलन्सवर नॉन-इंटरेस्ट आकारलेला नसल्यास, व्यवहाराच्या तारखेपासून फायनॅन्स शुल्क लागू केले असल्यास मागिल स्टेटमेंट तारखेपासून फायनॅन्स शुल्क आकारले जाईल.

जर स्टेटमेंट आऊटस्टॅन्डींगमधे कॅश शिल्लक नसल्यास आणि मागिल स्टेटमेंटपासून कॅरीड फॉरवर्ड केले नसल्यास आणि स्टेटमेंट तारखेस रिटेल बॅलन्स आऊटस्टॅन्डींग पेमेंट भरायच्या असलेल्या तारखेस पूर्णपणे भरला असल्यास अश्या बॅलन्सेसवर फायनॅन्स शुल्क लागू होणार नाही.

उदाहरण 2 – कार्ड स्टेटमेंट तारीख – प्रत्येक महिन्याची २ तारीख.

३ जानेवारी '१५ – २ फेब्रुवारी '१५ या दरम्यान केलेले व्यवहार

1. रु. १०००० ची किरकोळ खरेदी – ०५ जानेवारी '१५ रोजी
2. रु. ३०००० ची ऑनलाईन खरेदी – १५ जानेवारी '१५ रोजी

मागील कोणतीही शिल्लक ०२ जानेवारी २०१५ च्या स्टेटमेंटमधून कॅरीड् फॉरवर्ड असल्याचे गृहीत न धरता, कार्डधारकास त्याच्या ०२ फेब्रुवारीच्या स्टेटमेंटमधे व्यवहार केल्याचे रु.४०,००० दिसतील. २२ फेब्रुवारी २०१५ अखेर असलेल्या आऊट्स्टॅन्डींगनुसार कार्डधारकास पेमेंट करावे लागेल, म्हणजेच स्टेटमेंट तारखेपासून २० दिवसातील संपूर्ण रक्कम किंवा किमान ड्यू अमाऊंट या दरम्यानची कोणतीही रक्कम. कृपया नोंद घ्या की आपल्या क्रेडीट कार्ड आऊट्स्टॅन्डींगसाठी केलेले कोणतेही पेमेंट्, आपल्या इएमआय शिल्लकसाठी (असल्यास) वापरले जाईल, त्यानंतर ट्रान्स्फर बॅलन्स (असल्यास), रिटेल बॅलन्स (असल्यास) यासाठी वापरले जाऊन शेवटी आपल्या कॅश बॅलन्ससाठी (असल्यास) ऍडजस्ट केले जाईल. आऊटस्टॅन्डींग रिटेल बॅलन्सवर नॉन-इंटरेस्ट आकारलेला नसल्यास, व्यवहाराच्या तारखेपासून फायनॅन्स शुल्क लागू केले असल्यास मागिल स्टेटमेंट तारखेपासून फायनॅन्स शुल्क आकारले जाईल.

जर स्टेटमेंट आऊटस्टॅन्डींगमधे कॅश शिल्लक नसल्यास आणि मागिल स्टेटमेंटपासून कॅरीड फॉरवर्ड केले नसल्यास आणि स्टेटमेंट तारखेस रिटेल बॅलन्स आऊटस्टॅन्डींग पेमेंट भरायच्या असलेल्या तारखेस पूर्णपणे भरला असल्यास अश्या बॅलन्सेसवर फायनॅन्स शुल्क लागू होणार नाही.

दर महिन्यात केवळ किमान पेमेंट केल्याने रिपेमेंट अनेक वर्षे लांबते आणि त्यामुळे आपल्या आऊटस्टॅन्डींग बॅलन्सवरही व्याज लागत असते. उदाहरणार्थ रु. ५,००० च्या व्यवहारावर दर महिन्यास (दर महिन्यातील किमान रक्कम रु. २०० लागू असताना) भरल्या जात असलेल्या किमान ड्यू अमाऊंटनुसार, पूर्ण आऊट्स्टॅन्डींग रक्कम भरण्यास ४४ महिने लागतील.

उदाहरण 3 –

कार्ड स्टेटमेंट तारीख – प्रत्येक महिन्याची २ तारीख.

३ मार्च ’१५ – २ एप्रिल ’१५ या दरम्यान केलेले व्यवहार

1. रु. ५००० ची किरकोळ खरेदी – ०५ मार्च '१५ रोजी
2. रु. ६००० ची ऑनलाईन खरेदी – १५ मार्च '१५ रोजी

मागील कोणतीही शिल्लक ०२ मार्च २०१५ च्या स्टेटमेंटमधून कॅरीड् फॉरवर्ड असल्याचे गृहीत न धरता, कार्डधारकास त्याच्या ०२ एप्रिलच्या स्टेटमेंटमधे व्यवहार केल्याचे रु.११,००० दिसतील. २२ एप्रिल २०१५ अखेर असलेल्या आऊट्स्टॅन्डींगनुसार कार्डधारकास पेमेंट करावे लागेल, म्हणजेच स्टेटमेंट तारखेपासून २० दिवसातील संपूर्ण रक्कम किंवा किमान ड्यू अमाऊंट या दरम्यानची कोणतीही रक्कम.

रु. ५५० साठी (एकूण आऊटस्टॅन्डींगच्या ५%) कार्डधारक किमान पेमेंट करत आहे असे गृहीत धरल्यास, २२ एप्रिल २०१५ रोजी, इफेक्टीव्ह रेटने फायनॅन्स शुल्क लागू असेल आणि ते एकूण आऊट्स्टॅन्डींगमधे मिळवले जाईल. ३.३५% प्रति महिना इफेक्टीव्ह रेट गृहीत धरल्यास, फायनॅन्स शुल्काची आकारणी खालीलप्रकारे केली जाईल:

रु. ५००० च्या शिल्लकीवर (५ मार्च ते २२ एप्रिल) ४९ दिवसांसाठी: (३.३५*१२)*(४९/३६५)*५०००/१०० = रु. २६९.८३

रु. ६००० च्या शिल्लकीवर (१५ मार्च ते २२ एप्रिल) ३९ दिवसांसाठी: (३.३५*१२)*(३९/३६५)*६०००/१०० = रु. २५७.७२

रु. १०४५० च्या शिल्लकीवर (२२ एप्रिल ते ०२ मे) १० दिवसांसाठी: (३.३५*१२)*(१०/३६५)*१०४५०/१०० = रु. ११५.०९

एकूण व्याज आकारणी = रु. ६४२.६४

आऊटस्टॅन्डींग खरेदी रक्कम, आकारलेले व्याज, लागू असल्यास फीज व शुल्क आणि सर्व लागू कर यांची बेरीज म्हणजेच ०२ मेच्या स्टेटमेंटमधे, ३ एप्रिल '१५ - ०२ मे '१५ दरम्यान कार्डधारकाने कोणताही व्यवहार केलेला नाही असे गृहीत धरता, दिसत असलेली एकूण ड्यू रक्कम.

दर महिन्यात जर कार्डधारक किमान ड्यू रक्कम (५%) आणि त्याचसोबत व्याजही भरत गेल्यास, २० महिन्यात (१००%/ ५% – २०) तो आऊट्स्टॅन्डींग रक्कम पूर्ण भरु शकेल .

G. पेमेंट ड्यू तारखेअखेर जर किमान ड्यू अमाऊंट न भरल्यास लेट् पेमेंट् शुल्क लागू होईल.

रु.० - रु.२०० च्या एकूण ड्यू अमाऊंटसाठी - काहीही नाही ;
रु.२०० ते रु.५०० किंवा त्याहून अधिक एकूण ड्यू अमाऊंटसाठी - रु.१०० ;
रु.५०० ते रु.1000 किंवा त्याहून अधिक एकूण ड्यू अमाऊंटसाठी - रु.२०० ;
रु.१००० ते रु.१०,००० किंवा त्याहून अधिक एकूण ड्यू अमाऊंटसाठी - रु.५०० ;
रु.१०,००० हून अधिक एकूण ड्यू अमाऊंटसाठी - रु.७५०

उदाहरण 1 -

कार्ड स्टेटमेंट तारीख – प्रत्येक महिन्याची ०२ तारीख.

०३ जाने '१५ - ०२ फेब्रु '१५ यादरम्यान झालेला व्यवहार

1. रु. ५००० ची किरकोळ खरेदी – ०५ जाने ’१५ रोजी
2. रु. ५००० ची ऑनलाईन खरेदी – १५ जाने '१५ रोजी

मागील कोणतीही शिल्लक ०२ जाने २०१५ च्या स्टेटमेंटमधून कॅरीड् फॉरवर्ड असल्याचे गृहीत न धरता, कार्डधारकास त्याच्या ०२ फेब्रुवारीच्या स्टेटमेंटमधे व्यवहाराचे रु.१०,००० चे व्यवहार दिसतील. २२ फेब्रुवारी २०१५ अखेर असलेल्या आऊट्स्टॅन्डींगनुसार कार्डधारकास पेमेंट करावे लागेल, म्हणजेच स्टेटमेंट तारखेपासून २० दिवसातील संपूर्ण रक्कम किंवा किमान ड्यू अमाऊंट या दरम्यानची कोणतीही रक्कम.

जर कार्डधारकाने २२ फेब्रुवारी २०१५ पर्यंत कोणतेही पेमेंट न केल्यास, त्याच्यावर रु. ५०० (रु.५०० - रु.१००० हून अधिक आणि रु.१०,००० पर्यंत) लेट पेमेंट शुल्क लागू होईल.

उदाहरण 2 - कार्ड स्टेटमेंट तारीख – प्रत्येक महिन्याची ०२ तारीख.

०३ फेब्रुवारी '१५ - ०२ मार्च '१५ यादरम्यान झालेला व्यवहार

1. रु. २००० ची किरकोळ खरेदी – ०८ फेब्रुवारी ’१५ रोजी
2. रु. २५०० ची ऑनलाईन खरेदी – १९ फेब्रुवारी '१५ रोजी

मागील कोणतीही शिल्लक ०२ फेब्रुवारी २०१५ च्या स्टेटमेंटमधून कॅरीड् फॉरवर्ड असल्याचे गृहीत न धरता, कार्डधारकास त्याच्या ०२ मार्चच्या स्टेटमेंटमधे व्यवहाराचे रु.४,५०० चे व्यवहार दिसतील. २२ मार्च २०१५ अखेर असलेल्या आऊट्स्टॅन्डींगनुसार कार्डधारकास पेमेंट करावे लागेल, म्हणजेच स्टेटमेंट तारखेपासून २० दिवसातील संपूर्ण रक्कम किंवा किमान ड्यू अमाऊंट या दरम्यानची कोणतीही रक्कम.

जर कार्डधारकाने २२ मार्च २०१५ पर्यंत कोणतेही पेमेंट न केल्यास, त्याच्यावर रु. ५०० (रु.५०० - रु.१००० हून अधिक आणि रु.१०,००० पर्यंत) लेट पेमेंट शुल्क लागू होईल.

H. ओव्हरलिमिट शुल्क - क्रेडीट लिमिटहून अधिक नसलेल्या कार्डधारकाच्या काही व्यवहारांना एसबीआय कार्ड सेवा म्हणून मान्यता देईल. कृपया नोंद घ्या की जर आऊट्स्टॅन्डींग रक्कम क्रेडीट लिमिटहून अधिक झाल्यास, ओव्हरलिमिट रकमेच्या २.५% किंवा रु.५००, यातील जी अधिक असेल ती रक्कम ओव्हरलिमिट फी म्हणून आकारली जाईल. फीज आणि/किंवा व्याज आकारणी यामुळेही ओव्हरलिमिट स्टेटस निर्माण होऊ शकते.

I. जर चेक बाऊन्स झाला तर चेकच्या रकमेच्या २% रक्कम शुल्क वसूल केले जाईल. (किमान रु.३५० आणि कमाल रु.५००).

J. इतर शुल्क:

- इनव्हॅलिड चेक फी: चेकच्या रकमेच्या २%, किमान रु.३५०/- कमाल रु.५००/-
- कार्ड रिप्लेसमेंट फी: रु.१००/-
- चार्ज स्लिप रिट्रीव्हल फी: रु.२२५/-
- चेक पिक अप् फी: रु.९०/-
- स्टेटमेंट रिट्रीव्हल फी: रु.१००/- प्रंति स्टेटमेंट, २ महिन्यांहून जुन्या स्टेटमेंट्साठी
- फॉरेन करन्सी ट्रॅन्झॅक्शन फी: ३.५%.

फॉरेन करन्सी ट्रॅन्झॅक्शनचे रुपांतर भारतीय रुपयांमधे करताना वापरला जाणारा एक्सचेंज रेट, व्हिसा/मास्टरकार्ड यातील जे लागू असेल, त्याने ठरवला जाईल. मात्र व्यवहाराच्या दिवशी त्यांच्या अखत्यारीत असलेला एक्सचेंज रेट एसबीआय कार्डसोबत सेटल केला जायला हवा, ज्याची तारीख व्यवहाराच्या तारखेहून निराळी असू शकते. व्हिसा/मास्टरकार्डने शेअर केलेल्या रुपांतरीत भारतीय रुपयांवर ३.५% फॉरेन करन्सी ट्रॅन्झॅक्शन फी लागू होईल.

2. लिमिट्स

SBICPSLच्या अंतर्गत क्रेडीट धोरणानुसार कार्डधारकासाठी क्रेडीट लिमिट आणि कॅश लिमिट यांची योजना केलेली असते (प्रायमरी अकाऊंट होल्डर्सएवढ्याच लिमिट्स ऍड्-ऑन् कार्डधारकांनाही असतात). कार्ड देतेवेळी या लिमिट्स कार्डधारकास सांगितल्या जातात. कार्डधारकाला क्रेडीट लिमिट आणि कॅश लिमिट्सबद्दल प्रत्येक

स्टेटमेंटमधूनही सांगितले जाते. स्टेटमेंट तयार होत असताना उपलब्ध असलेले क्रेडीट लिमिट (म्हणजेच उपयोगासाठी उपलब्ध असलेले क्रेडीट) हे स्टेटमेंटचा एक भाग म्हणूनच पुरवले जाते. SBICPSL काही विशिष्ट कालावधीनंतर कार्डधारकाच्या खात्याचा आढावा घेईल, आणि अंतर्गत धोरणानुसार कार्डधारकाचे क्रेडीट लिमिट वाढवेल किंवा कमी करेल. ज्या कार्डधारकांना त्यांचे क्रेडीट लिमिट वाढवून हवे आहे त्यांनी तशी लेखी विनंती SBICPSL ला पाठवावी आणि आपली मिळकत जाहीर करणारी कागदपत्रेही त्यासोबत पुरवावीत. SBICPSL, स्वनिर्णय आणि पुरवल्या गेलेल्या अश्या नव्या कागदपत्रांच्या आधारावर, कार्डधारकाचे क्रेडीट लिमिट वाढवू शकेल.

3. बिलिंग आणि स्टेटमेंट

a) कार्डधारकाला SBICPSL कडून मासिक स्टेटमेंट पाठवले जाईल, ज्यामधे मागील स्टेटमेंट्नंतर कार्डधारकाच्या खात्यामधे जमा झालेली पेमेंट्स आणि डेबिट् झालेले व्यवहार यांचा समावेश असेल. मात्र, या कालावधीदरम्यान कार्ड ऍक्टीव्ह असायला हवे. SBICPSL कडे नोंद असलेल्या पत्त्यावर कार्ड खात्यातील व्यवहारांचे हे स्टेटमेंट मेल केले जाईल किंवा नोंद असलेल्या ईमेल आयडीवर हे स्टेटमेंट पूर्वनियोजित तारखेस ईमेल केले जाईल.

b) कार्डधारकास क्रेडीट कार्ड रिव्हॉल्व्हींग क्रेडीट सुविधा देऊ करते. स्टेटमेंटमधे छापलेल्या केवळ किमान ड्यू अमाऊंटचे पेमेंट करण्याची निवड कार्डधारक करु शकतो आणि आपल्या स्टेटमेंटवर छापलेल्या पेमेंट ड्यू तारखेपूर्वीच असे पेमेंट पाठवायला हवे. बॅलन्स आऊट्स्टॅन्डींग नंतरच्या स्टेटमेंट्समधे कॅरी फॉरवर्ड केले जाऊ शकते. एकूण ड्यू अमाऊंट किंवा किमान ड्यू अमाऊंटच्या वरील कोणत्याही रकमेच्या कोणत्याही भागाचे पेमेंट करण्याची निवड कार्डधारक करु शकतो. मागील स्टेटमेंट्समधील कोणतीही अनपेड् किमान ड्यू अमाऊंट कार्डधारकाच्या सध्याच्या किमान ड्यू अमाऊंटमधे, कार्डधारक क्रेडीट लिमिटहून अधिक असलेल्या आऊट्स्टॅन्डींग़सोबतच मिळवली जाईल.
किमान ड्यू अमाऊंट ही आऊट्स्टॅन्डींग अमाऊंटच्या ५% किंवा रु. २०० असेल (यातील जी रक्कम अधिक असेल + सर्व लागू कर आणि ईएमआय (केवळ ईएमआयआधारीत उत्पादनांसाठी). कॅश किंवा क्रेडीट लिमिटचे उल्लंघन केल्यास ओव्हरलिमिट (ओव्हिएल) अमाऊंटचाही समावेश एमएडीमधे होईल. मागील स्टेटमेंट्समधे कोणतेही अनपेड एमएडी असल्यास, त्याचाही समावेश किमान ड्यू अमाऊंटमधे केला जाईल.

c) कार्ड आऊट्स्टॅन्डींगसाठी केलेल्या पेमेंट्सचा उल्लेख त्यानंतरच्या स्टेटमेंट्समधे केला जाईल.

d) कार्डधारकाच्या कार्ड आऊटस्टॅन्डींगसाठीची पेमेंट्स सर्व किमान ड्यू अमाऊंट (ज्यामधे लागू असलेले सर्व कर + लोन प्लॅन्सवरील ईएमआय + एकूण आऊट्स्टॅन्डींग़च्या ५% यांचा समावेश आहे), फीज आणि इतर शुल्क, व्याज आकारणी, बॅलन्स ट्रान्स्फर आऊट्स्टॅन्डींग, पर्चेस आऊट्स्टॅन्डींग आणि कॅश ऍड्व्हान्स याक्रमाने ऍडजस्ट केली जातील.इ) कार्ड खात्यातील पेमेंट्स खालीलपैकी कोणत्याही प्रकारे करता येईल:

e) स्टेटमेंटच्या मागील भागावर उल्लेखलेल्या मेलिंगच्या पत्त्यावर चेक किंवा ड्राफ्ट मेल करुन.

चेक किंवा ड्राफ्ट आपल्या शहरातील कोणत्याही एसबीआय कार्ड ड्रॉप बॉक्समधे किंवा स्टेट बॅन्क ऑफ इंडियाच्या विशिष्ट शाखांमधील बॉक्समधे टाकून.

“एसबीआय कार्ड क्रमांक xxxxxxxxxxxxxxxx” साठी चेक /ड्राफ्ट पेएबल असावा.

ईसीएस: मोठ्या शहरातील इलेक्ट्रॉनिक क्लियरिंग सिस्टीम (ईसीएस) द्वारेही पेमेंट्स करता येतील.

f) बिलिंग आऊट्स्टॅन्डींग पेमेंट करण्याचे निरनिराळे मार्ग एसबीआय कार्ड देऊ करते. मासिक स्टेटमेंटच्या पाठीमागच्या भागावर आणि एसबीआय कार्ड संकेतस्थळावर हे स्पष्ट करुन दाखवले आहे.

g) बिलिंग तक्रारी: स्टेटमेंट तारखेपासून ३० दिवसांच्या आत जर कार्डधारकाने SBICPSLच्या निदर्शनास त्यातील तफावत लक्षात आणून न दिल्यास त्यातील सर्व मजकूर योग्य आहे आणि कार्डधारकास मान्य आहे असे समजले जाईल आणि या तफावतींमधे SBICPSL ला तथ्य आढळायला हवे. अश्याप्रकारची माहिती मिळताच, SBICPSL शुल्क कदाचित तात्पुरते उलटे फिरवेल. त्यानंतरच्या तपासणीच्या पूर्ततेनंतर, अश्याप्रकारच्या शुल्काची जबाबदारी कार्डधारकाच्या खात्याची असेल. प्रति चार्ज स्लिप रु.२२५ याप्रमाणे चार्ज स्लिप रिट्रीव्हल शुल्कासह त्यानंतरच्या स्टेटमेंटमधे शुल्क पूर्वीसारखे केले जाईल.

h) ग्राहक तक्रारनिवारण: सर्व तक्रारी नोडल ऑफीसरकडे, पीओ बॅग २८ - जीपीओ, नवी दिल्ली - ११०००१ किंवा Nodalofficer@sbicard.com येथे ईमेलद्वारे पाठवाव्यात.

i) संपर्क साधण्यासाठी तपशिल:

सर्व दूरध्वनींद्वारे : ३९ ०२ ०२ ०२ **(**मोबाईल फोनवरुन संपर्क साधताना आधी आपल्या शहराचा एसटीडी कोड लावा**)**

बीएसएनएल/एमटीएनएल : १८६० १८० १२९०**/**१८०० १८० १२९०

एसबीआय रेल्वे क्रेडीट कार्ड्साठी : एसबीआय रेल्वे क्रेडीट कार्ड् हेल्पलाईनशी भारतातून कोठूनही संपर्क साधा**.**

सर्व दूरध्वनींवरुन : ३९ ०२ १२ १२ **(**मोबाईल फोनवरुन संपर्क साधताना आधी आपल्या शहराचा एसटीडी कोड लावा**)**

बीएसएनएल/एमटीएनएल : १८०० १८० १२९५

पत्रव्यवहार: मेलद्वारे, व्यवस्थापक - ग्राहक सेवा, SBI Cards & Payment Services Pvt. Ltd., डीएलएफ इन्फीनिटी टॉवर्स, टॉवर सी, १२वा मजला, ब्लॉक २, इमारत ३, डीएलएफ सायबर सिटी, गुरगाव १२२००२ (हरयाणा) भारत यांना, www.sbicard.com किंवा पीओ बॉक्स २८ - जीपीओ, नवी दिल्ली - ११०००१ येथे लिहा.

ईमेलद्वारे feedback@sbicard.com येथे संपर्क साधा.

4. डीफॉल्ट

डीफॉल्ट प्रसंगी, कार्ड खात्यावरील आऊट्स्टॅन्डींगच्या सेटलमेंट्साठी कार्डधारकास पोस्ट-फॅक्स-टेलिफोन-ईमेल-एसएमएस मेसेजिंग आणि / किंवा थर्ड पार्टीच्या सेवांद्वारे तत्संबंधी आठवण करुन देण्यास-पाठपुरावा करण्यास-ड्यूज वसूल करुन घेण्यास वेळोवेळी रिमाईंडर्स पाठवली जातील. त्यासाठी योजना करण्यात आलेल्या कोणत्याही थर्ड पार्टीने, वसूलीसाठी असलेल्या वर्तनाच्या नियमांनुसारच कार्यवाही करावी.

कार्ड खात्यावरील एकूण आऊटस्टॅन्डींगसह, खात्यातून आकारणी करण्यास लागू असलेले परंतु अद्यापी वसूल न झालेली शुल्के त्वरीत ड्यू होतील आणि दिवाळखोरी किंवा प्रायमरी कार्डधारकाच्या मृत्युप्रसंगी SBICPSL मधे भरावी लागतील आणि कार्ड खाते त्वरीत रद्द होईल. कार्ड खात्यातील आऊट्स्टॅन्डींगच्या वसूलीसाठी प्रायमरी कार्डधारकाची मालमत्ता जबाबदार राहील आणि यासंबंधी येणारा सर्व खर्च यापासून, ज्यामधे कायदेशीर सल्ल्याची फी आणि अश्या आऊट्स्टॅन्डींगची वसूली करताना येणारा खर्च याचा समावेश आहे, एसबीआयसीपीएसएल चा बचाव करण्यात आलेला आहे. अश्या वसूलींसाठी, SBICPSLच्या सध्याच्या दरानुसार फायनॅन्स शुल्काची आकारणी करणे चालू ठेवण्यास SBICPSL ला अधिकार आहे.

5 कार्डधारकत्वाचे टर्मिनेशन / रिव्होकेशन

a) SBICPSL ला लिखित स्वरुपात विनंती किंवा एसबीआयच्या कार्ड हेल्पलाईनला फोन करुन आणि कार्ड (काड्र्स) तिरपे कापून कार्डधारक कैंव्हाही करारसमाप्ती करु शकतो. लिखित स्वरुपातील विनंतीनुसार ऍड ऑन काड्र्सनाही समाविष्ट करता सर्व कार्डस रद्द होतील. कार्ड खात्यावरील सर्व आऊट्स्टॅन्डींग रकमांचे पेमेंट झाल्यानंतरच कार्ड रद्द होईल. प्रो-राटा तत्वानुसार वार्षिक, जॉईनिंग किंवा नूतनीकरण फीज परत दिली जाणार नाही.

b) जर SBICPSL ला व्यवसाय किंवा सुरक्षा यासंबंधीची कारणे आणि / किंवा कायदेशीर एजन्सी आणि / किंवा कोणत्याही सरकारी संस्थेकडून विनंती आल्यास आणि / किंवा SBICPSL व तिच्या ग्राहकांना लागू असलेली सर्व कायदेशीर कारणे व बंधने यासाठी कार्डधारकच्या खात्यावरील निर्बंधी, रद्द करणे किंवा निलंबन करणे यासारखी कार्यवाही कोणत्याही क्षणी, कोणतीही पूर्वसुचना न देता SBICPSL करु शकते.

कार्डधारकाकडून ड्यू पेमेंटचे डिफॉल्ट किंवा एक्स्टेंडेड क्रेडीट लिमिटचे उल्लंघन झाल्यास SBICPSL क्रेडीट कार्ड सुविधा निलंबीत करु शकते. कराराच्या समाप्तीनंतर किंवा कार्ड खात्याच्या निलंबनादरम्यान कार्डचा वापर होता कामा नये.

c) अश्या परिस्थितीत, कार्डधारकाने (कोणताही डीफॉल्ट किंवा कायद्यानुसार आवश्यक इतर नोटीस) खात्यावरील एकूण आऊट्स्टॅन्डींग बॅलन्स त्वरीत SBICPSL कडे जमा करायला हवा. यामधे करारानुसार SBICPSL कडे ड्यू असलेल्या सर्व रकमा, ज्यामधे सर्व व्यवहार आणि खात्यावर अद्यापी लागू न केलेल्या इतर रकमा यांचा समावेश आहे, याचा समावेश आहे. कार्डधारक जोवर असे ड्यूज् पूर्णपणे भरत नाही तोपर्यंत त्याचे खाते बंद झाले आहे असे गृहीत धरले जाणार नाही.

6. कार्ड गहाळ होणे / त्याची चोरी होणे / त्याचा दुरुपयोग होणे

a) प्रायमरी किंवा इतर कोणतेही अतिरिक्त क्रेडीट कार्ड गहाळ होणे, हरवणे, चोरीस जाणे, नुकसान होणे, प्राप्त व्हावयाचे असूनही योग्य वेळी प्राप्त न होणे किंवा आपल्या संमतीशिवाय कार्ड वापरले जात आहे असा संशय कार्डधारकास येणे अश्या सर्व प्रसंगांची माहिती कार्डधारकाने SBICPSL ला एसबीआय कार्ड हेल्पलाईनवर संपर्क साधून तत्काळ द्यायला हवी. कार्ड गहाळ झाल्याची सुचना दिली गेल्यानंतर जरीही कार्ड सापडले तरीही कार्डधारकाने त्याचा कोणत्याही परिस्थितीत वापर करु नये आणि कार्डधारकाने असे कार्ड तिरपे दोन भागात कापून टाकावे.

- कार्डधारक आयव्हिआर मधे किंवा आमच्या website www.sbicard.comor या संकेतस्थळावर जाऊन एसएमएसआधारीत सेवेद्वारे आपले कार्ड तत्काळ ब्लॉक करु शकतो.
- एसएमएसद्वारे आपले गहाळ झालेले / चोरीस गेलेले कार्ड ब्लॉक करण्यासाठी, BLOCK XXXX हा एसएमएस आपल्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरुअन ५६७६७९१ या क्रमांकावर करा. (XXXX = आपल्या कार्ड क्रमांकाचे शेवटचे ४ क्रमांक). आपण अशी विनंती केल्यानंतर ५ मिनिटांच्या आत आपल्याला कन्फर्मेशन एसएमएस न आल्यास, आपले कार्ड ब्लॉक झालेले आहे असे कृपया समजू नका. कृपया हेल्प लाईनला फोन करुन आपल्या कार्डचा दुरुपयोग होऊ नये यासाठी त्वरीत ब्लॉक करा.

b) कार्ड गहाळ झाल्यानंतर त्यासंबंधी SBICPSL ला माहिती देईपर्यंत जर त्या कार्डद्वारे कोणतेही व्यवहार झाले तर त्यासाठी SBICPSL ला जबाबदार धरता येणार नाही आणि कार्डधारकच अश्याप्रकारच्या व्यवहारांसाठी जबाबदार असेल. कार्ड गहाळ झाल्याबाबत SBICPSL ला योग्य पद्धतीने प्राप्त झालेल्या नोटीफीकेशननंतर, कार्डधारकाची त्यानंतरची जबाबदारी कमाल रु. १००० पर्यंत गृहीत धरली जाईल (एसबीआय गोल्ड कार्डधारकांसाठी - काही नाही). कार्ड गहाळ होणे किंवा चोरीस जाणे याबाबत SBICPSL ला कळविण्याशिवाय, कार्डधारकाने कार्ड (कार्ड्स) च्या चोरीबद्द्ल पोलिसांना कळवून तशी एफआयआर ही नोंदवायला हवी. मात्र कार्डधारकाच्या संमतीने किंवा अतिरिक्त कार्डधारकाच्या संमतीने कोणी कार्ड हस्तगत करुन त्याचा किंवा पीआयएन चा दुरुपयोग केल्याने सर्व हानीस सर्वस्वी कार्डधारकच जबाबदार असेल.

c) कार्डधारकाच्या अप्रामाणिक कृतीमुळे झालेल्या सर्व हानीस कार्डधारकच जबाबदार असेल. कार्ड वापराच्या संबंधी कार्डधारकाने योग्य ती काळजी घेतली न घेतल्यास उद्भवऊ शकतील अश्या सर्व हानीस कार्डधारकासच जबाबदार धरले असेल. SBICPSL ने नमूद केलेल्या सर्व सुरक्षा घटकांचे काटेकोर पालन न करण्याने होणारी हानीसदेखिल कार्डधारकच जबाबदार असेल.

d) कार्ड किंवा पीआयएन गहाळ होणे, त्याची चोरी होणे किंवा दुरुपयोग होणे यासंबंधित संयुक्तिक वाटणारी माहिती , कार्डधारक किंवा अन्य कोणीही अतिरिक्त कार्डधारक यांचा संदर्भ न देता पोलिस किंवा तश्याच प्रकारच्या संस्थांना SBICPSL देऊ शकेल.

e) आपल्या क्रेडीट कार्ड खात्याच्या संपर्क तपशिलामधे बदल झालेले असल्यास त्यासंबंधी आपल्या नवीन तसेच यंत्रणेत नोंद असलेल्या जुन्या पत्त्यावर कळविले जाईल. आपल्या सध्याच्या तपशिलाची माहिती आमच्या रेकॉर्ड्समधे असावी असा आमचा आपल्याला सल्ला आहे.

8. प्रकटीकरण

कार्डधारकास याचे ज्ञान आहे की कार्डधारकाची माहिती, या संबंधी कार्डधारकास कोणतीही पूर्वसुचना न देता, सध्या कार्यरत असलेल्या किंवा भविष्यात निर्माण झालेल्या क्रेडीट ब्युरोंना सांगण्याचा अधिकार SBICPSL ला आहे. आणि ही माहिती कार्डधारकाच्या कोणत्याही सकारात्मक किंवा नकारात्मक कृती / डिफॉल्ट यासंबंधी असू शकते. अश्या प्रकारच्या माहितीचे नोंद क्रेडीट ब्युरोच्या अहवालामधे होण्यास ४५-६० दिवसांचा कालावधी लागू शकतो.

भारत सरकार आणि रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडिया (आरबीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने Credit Information Bureau India Ltd. (CIBIL) ची निर्मिती भारतीय अर्थ व्यवस्थेचे कार्य आणि स्थिरता यांच्यात सुधारणा व्हावी यासाठी करण्यात आलेली आहे. बॅन्क्स् आणि वित्तीय संस्था यांच्यादरम्यान माहितीची देवाणघेवाण सुरळीत व्हावी आणि त्याद्वारे निरनिराळ्या संस्थांकडून उत्तम क्रेडीट सेवा मिळण्यास कार्डधारक पात्र व्हावेत, यासाठी ही कृती आरबीआय घेत असलेल्या प्रयत्नांना अनुसरुनच आहे.

कार्डधारकास याचीदेखिल जाणिव आहे की कार्ड खात्याचे कार्य योग्यप्रकारे चालावे, त्याची पडताळणी योग्यप्रकारे व्हावी आणि इतर प्रशासकीय सेवा यासाठी कार्डधारकाची माहिती, ज्यामधे पेमेंटमधील डिफॉल्टचाही समावेश आहे, वित्तीय संस्था - मालक आणि SBICPSLसाठी कार्यरत असलेल्या इतर थर्ड पार्टींना सांगण्याचा SBICPSL अधिकार आहे.

SBICPSLच्या कोणत्याही पालक, दुय्यम सहाय्यक संस्था, संलग्न संस्था आणि सहाय्यक संस्थेस कार्डधारकाची माहिती SBICPSL किंवा तिच्या घटक संस्था, दुय्यम सहाय्यक संस्था, संलग्न संस्था आणि / किंवा सहाय्यक संस्था यांचे मार्केटींग - निरनिराळ्या उत्पादनांचे सादरीकरण - सेवा यासाठी सांगण्याचा अधिकार SBICPSL ला आहे.

एसबीआय कार्डासंबंधित अत्यंत महत्वाच्या अटी आणि नियम www.sbicard.com येथेही उपलब्ध आहेत.

1: शुल्कांचा तपशिल

फीज	
जॉईनिंग फीज (एकदाच)	रु. ४९९९ पर्यंत
वार्षिक फीज (प्रति वर्ष)	रु. ४९९९ पर्यंत
ऍड् ऑन् फी (प्रति वर्ष)	नाही
एक्स्टेंडेड क्रेडीट	
इंटरेस्ट फ्री क्रेडीट पिरियड्	२०-५० दिवस (केवळ किरकोळ खरेदी आणि मागिल महिन्यातील आऊट्स्टॅन्डींग बॅलन्स पूर्ण भरला असल्यासच लागू)
फायनॅन्स शुल्क #	३.३५% प्रति महिन्यापर्यंत (४०.२% प्रति वर्ष) व्यवहाराच्या तारखेपासून
किमान ड्यू अमाऊंट	एकूण आऊट्स्टॅन्डींगच्या ५% (किमान रु. २००) + सर्व लागू कर + इएमआय (कर्ज घेतले असल्यास)
कॅश ऍड्व्हान्स	
कॅश ऍड्व्हान्स लिमिट्	क्रेडीट लिमिटच्या ८०% पर्यंत (कमाल १२००० / दिवस सोने व टायटॅनियमसाठी दिवस आणि १५००० / दिवस प्लॅटीनम काड्र्स आणि
फ्री क्रेडीट पिरियड	नाही
फायनॅन्स शुल्क #	३.३५% प्रति महिना पर्यंत (४०.२% प्रति वर्ष) विथड्रॉवल तारखेपासून
कॅश ऍड्व्हान्स फीज	
एसबीआय एटीएम्स/इतर देशी एटीएम्स	२.५% - किमान रु. ३००
आंतरराष्ट्रीय एटीएम्स	३.०% - किमान रु. ३००
इतर शुल्क आणि फीज	
कॅश ओटीसी	रु. १००
चेक पिकअप्	रु. ९०
चेक बाऊन्स / इनव्हॅलिड् चेक	चेकच्या रकमेच्या २% (किमान रु. ३५९ आणि कमाल रु. ५००)
स्टेटमेंट रिट्रीव्हल	रु. १०० प्रति स्टेटमेंट (>२ महिने जुने)
चार्ज स्लिप् रिट्रीव्हल	रु. २२५ प्रति चार्ज स्लिप
लेट् पेमेंट्	काही नाही - रु.० - रु.२०० च्या एकूण ड्यू रकमेस; रु.१०० - रु. २०० हून अधिक आणि रु.५०० पर्यंतच्या एकूण ड्यू रकमेस; रु.२०० - रु. ५०० हून अधिक आणि रु.१००० पर्यंतच्या एकूण ड्यू रकमेस; रु.५०० - रु. १००० हून अधिक आणि रु.१०००० पर्यंतच्या एकूण ड्यू रकमेस;

	रु.७५० - रु. १०००० हून अधिक एकूण ड्यू रकमेस;
ओव्हरलिमिट	ओव्हरलिमिट अमाऊंट्च्या २.५% (किमान रु. ५००)
कार्ड रिप्लेसमेंट	रु. १००
इमर्जन्सि कार्ड रिप्लेसमेंट् (परदेशी असताना)	ऍक्चुअल कॉस्ट् (किमान $१७५)
फॉरेन करन्सी ट्रॅन्झॅक्शन	कन्व्हर्जन मार्क अप: ३.५%
रिवॉड्र्स रिडंप्शन फी	रु. ९९
सरचार्ज	
रेल्वे तिकीटे - रेल्वे काऊंटर्स	रु. ३० + ट्रॅन्झॅक्शन अमाऊंटच्या २.५%
रेल्वे तिकीटे - www.irctc.co.in	ट्रॅन्झॅक्शन अमाऊंटच्या १.८% + सेवा शुल्क, लागू असल्यास
पेट्रोल आणि सर्व उत्पादने / पेट्रोल पंपावर विकलेल्या सेवा	सिग्नेचर आणि प्लॅटीनम काड्र्ससाठी रु. ५०० आणि रु. ४००० दरम्यानच्या एका ट्रॅन्झॅक्श्नसाठी २.५% सरचार्ज वेव्हर (इतर सर्व लागू कर + इतर शुल्क वगळता); रु.५०० आणि रु.३००० इतर सर्व काड्र्ससाठी सिग्नेचर आणि प्लॅटीनम काड्र्ससाठी कमाल सरचार्ज वेव्हर रु. २५० प्रति स्टेटमेंट सायकल प्रति क्रेडीट कार्ड खाते; रु.१०० प्रति क्रेडीट कार्ड खाते इतर सर्व काड्र्ससाठी ट्रॅन्झॅक्शन अमाऊंट्च्या २.२५% (किमान रु. १०) सिग्नेचर आणि प्लॅटीनम काड्र्ससाठी ट्रॅन्झॅक्शन अमाऊंट् < रु. ५०० आणि > रु. ४,०००; अमाऊंट्स < रु. ५०० आणि > रु. ३,००० इतर सर्व काड्र्ससाठी
कस्टम्स् ड्युटीचे पेमेंट	ट्रॅन्झॅक्शन अमाऊंट्च्या २.२५% (किमान रु. ७५)

वरील सर्व फीज, व्याज आणि शुल्क यावर सर्व लागू असलेले कर आकारले जातील.

कार्डधारकाच्या खात्यासाठी केली जाणारी सर्व पेमेंट्स ही किमान ड्यू अमाऊंट(ज्यामधे सर्व लागू कर + लोन प्लॅन्सवरील इएमआय + एकूण आऊट्स्टॅन्डींगच्या ५% यांचा समावेश असेल), फीज आणि इतर शुल्क, व्याज आकारणी , बॅलन्स ट्रान्स्फर आऊट्स्टॅन्डींग, खरेदी आऊट्स्टॅन्डींग आणि कॅश ऍड्व्हान्स यानुसार सेटल् केली जातील.

*

कार्ड फायनॅन्स शुल्क हे अनिवार्य असेल आणि कार्डधारकाचा वापर व पेमेंट पॅटर्न यावर अवलंबून असेल आणि ठराविक कालावधीनंतर घेतला जात असलेला आढावानुसार लागू असेल.